# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

क्रमांक : बैठक-१८२३/प्र.क्र. २४९/बैठक/३१ जुलै/२०२३/३०८० दिनांक : 18 AUG 2023

## बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, दिनांक ३१ जुलै, २०२३ रोजी दुपारी १२:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **७१व्या** बैठकीचे इतिवृत्त,-

प्राधिकरणाचे सदस्य डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे), श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ३) डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व ४) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही त्यानुसार त्यांना अनुपस्थित घोषित करण्यात आले.

तथापि श्री. प्रकाश बच्छाव, सह-संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे (दूरदृष्यप्रणालीद्वारे), डॉ. गोविंद रे. संगवई, प्र. उपसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई हे संबंधित संचालकांच्या वतीने प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित होते.

वैद्य जातवेद ज. पवार, प्रतिनिधी, आयुष संचालनालय, मुंबई व श्री. विकास हरीश्चंद्र चौधरी, प्रतिनिधी, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक हे विशेष निमंत्रित बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

<u>विषय क्रमांक १:</u> <u>प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०६/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७०व्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत.</u>

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०६/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७१व्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्यात आले. सर्व संबंधितांनी याबाबत नोंद घेण्यात यावी.

<u>विषय क्रमांक २:</u> <u>प्राधिकरणाच्या क्रमांक ६९ च्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.</u>

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०६/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७१व्या बैठकीच्या इतिवृत्तांनुसार प्राधिकरण कार्यालयाद्वारे करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालील प्रमाणे आहे,-

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १. | १ | मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०६/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७०व्या बैठकीचे इतिवृत्त | प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०६/२०२३ रोजी झालेल्या ७० व्या बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना दिनांक २०/०७/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.<br><br>भाईसाहेब सावंत आयुर्वेद महाविद्यालय, सावंतवाडी, सिंधुदूर्ग व कर्मवीर व्य.ता. रणधीर आयुर्वेद महाविद्यालय, बोराडी, धुळे या संदर्भात प्राधिकरणाच्या निर्णयानुसार दिनांक २९/०७/२०२३ रोजीचे प्रवेश मान्यता पत्रे निर्गमित करण्यात आलेली आहे. |
| २. | २ | प्राधिकरणाच्या क्रमांक ६९च्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल. | प्राधिकरणाच्या निर्देशानुसार कार्यालयाच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे. |
| ३. | ३(क) | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये बैठक क्र. ६९व्या (दिनांक ३१/०५/२०२३ रोजीच्या) बैठकी नंतर प्राप्त झालेल्या तसेच प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०५/२०२३ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेण्याबाबत. | प्राधिकरणाच्या निर्णयानुसार प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | बैठक दिनांक व विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ४. | ३(ख) | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश खालील संचालनालयांनी सादर केलेल्या पुन:श्च पडताळणी अहवालानुसार मान्यता देण्याबाबत,- | प्राधिकरणाचे निर्णय सर्व संबंधितांना दिनांक १८/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आले आहे. |

सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरण कार्यालयाद्वारे केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली. तसेच प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२३ रोजीच्या बैठकीपासून पारीत करण्यात आलेल्या निर्देशानुसार सीईटी कक्षाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल मूळ नस्तीसह प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

<u>विषय क्रमांक ३:</u> <u>महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५)(४) मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केद्रींभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान उद्धवलेल्या तक्रारींचा व तद्नुषंगाने घेतलेल्या निर्णयाचा आढावा.</u>

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आलेल्या आहे. या संदर्भांत अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार सदरील प्रक्रिये दरम्यान हितसंबंधित घटकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी व तद्नुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरणास अवगत केला (<u>प्रपत्र-अ</u>). याबाबत सीईटी कक्षातील सर्व संबंधित परीक्षा समन्वयक / सहा. परिक्षा समन्वयक यांनी अभ्यासक्रम-निहाय आढावा सादर केला व त्यानुसार सांगोपांग चर्चा करण्यात आली. प्रस्तूत प्रकरणी सीईटी कक्षाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

उच्च शिक्षण संबंधित अभ्यासक्रम प्रवेशाबाबतच्या तक्रांरीमधील पदविका अभियांत्रिकी व आय.टी.आय. अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक अर्हता धारक उमेदवारांच्या पात्रतेबाबत खातरजमा करुन त्याचा अहवाल आगामी बैठकित सादर करावा.

<u>विषय क्रमांक ४:</u> <u>मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.</u>

(क) <u>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तांवावर निर्णय घेण्याबाबत.</u>

अधिनियम २०१५ मधील तरतदूींच्या अनुषंगाने संबंधित संचालकांनी सादर केलेल्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर आयुष शिक्षण, तंत्र शिक्षण व उच्च शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांचे अवलोकन करण्यात आले व या संदर्भात प्राधिकरणाने खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

(ज. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

तसेच आयुष अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १) PWD, २) DEFENCE, ३) MKB, ४) ORPHAN व ५) अनिवासी भारतीय (एनआरआय ) संवर्गातून व संस्था स्तरावर महाविद्यालयांनी केलेली प्रवेश प्रक्रिया इ. प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी सदरील प्रवेशाचा दावा सिद्ध करण्याकरिता आवश्यक / विहित केलेल्या व त्यानुसार सादर केलेल्या संबंधीत कागदपत्रांची तपासणी करण्याप्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २८/०३/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या उपसमितीने तपासणी/छाननीची कार्यवाही करावी. या प्रक्रियेमध्ये उपसमितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर निर्णयाकरिता प्राधिकरणापुढे ठेवावे.

२) प्रस्तूत प्रकरणी संबंधित संचालकांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत, १% प्राधिकरण स्तरावरील उपसमितीच्या पडताळणी अहवालानुसार त्रुटी नाहीत तसेच प्राधिकरणाने विहित कलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे. अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, सदरील संचालनालय/अभ्यासक्रम <u>(प्रपत्र-ब/महाविद्यालय-निहाय )</u> प्रवेश मान्य करण्यात येत आहे.

३) ज्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश संख्या ० (शुन्य) आहे, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत संबंधित संचालक यांनी अभिप्राय सादर करावेत व सदर अभिप्रायाच्या अनुषंगाने सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

प्रवेश प्रक्रियेनंतर ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश संस्थास्तरावर रद्द करण्यात आले आहेत, अशा प्रवेशांबाबत महाविद्यालयांनी अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. या संदर्भात आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी संबंधित सेवा पुरवठादार यांच्यामार्फत उचित कार्यवाही करावी.

तसेच संचालकांनी सादर केलेल्या अहवालामध्ये व सीईटी कक्षाच्या प्राप्त माहितीनुसार (Database मध्ये) प्रवेशित विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये फरक/बदल असल्यास संबंधित सेवापुरठादार यांनी संचालकांच्या अहवालानुसार प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती तपासून संबंधित परिक्षा समन्वयक यांच्या परवानगीने प्राधिकरणाच्या पोर्टलवर प्रवेशित विद्यार्थ्यांचा तपशील अद्यावत करण्यासंबंधी उचित कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत. याबाबत आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी पुढील बैठकीत अहवाल सादर करावा. प्रवेश बंद दिनांकानंतर ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश संस्थास्तरावर रद्द करण्यात आले आहेत. अशा प्रवेशांबाबत महाविद्यालयाकडून सुस्पष्ट खुलासा मागविण्यात यावा.

४) अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतूदींनुसार प्रवेश मान्यता प्रस्ताव संचालकांचा प्रवेश पडताळणी अहवाल व प्रक्रिया शुल्कासह सादर केला आहे. संचालनालयाच्या प्रवेश पडताळणी अहवालात व प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात आलेल्या १% प्रवेश पडताळणीमध्ये त्रुटी नसलेल्या प्रवेशांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत असे प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत. या अमान्य प्रवेशा संदर्भात हितसंबंधीत घटक मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्णयांच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या दिनांक १/१०/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार पुनर्विलोकन याचिका विहित पध्दतीनुसार सादर करु शकतील.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

५) प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे **(प्रपत्र-ब)**, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२१-२२ नुसार) कार्यवाही करावी,.

६) अधिनियम २०१५ च्या तरतुदीनुसार ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्तया प्रस्ताव विहित कालावधीत प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर केलेला नाही, अशा महाविद्यालयांबाबत कायद्यातील तरतुदीनुसार कार्यवाही करावी, अशी शिफारस करण्यात आली.

(ख) **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश खालील संचालनालयांनी सादर केलेल्या पुनःश्च पडताळणी अहवालानुसार मान्यता देण्याबाबत.-**

१) **तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे अभ्यासक्रम-निहाय अहवाल.**
२) **उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे अभ्यासक्रम-निहाय अहवाल.**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या वेळोवेळी झालेल्या बैठकीमध्ये प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि, ज्या प्रवेश प्रकरणी संबंधित संचालकांनी त्रुटी दर्शविली अशा प्रकरणांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही. या संदर्भात मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीतील विषय सूची क्रमांक २(ड) अन्वये त्रुटी असलेल्या प्रवेश प्रकरणी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सविस्तर अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करावा, असे निर्देश होते.

प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी ना मंजुर असलेल्या (प्रलंबित प्रकरणी) प्रवेशांबाबत त्वरीत निपटारा होण्याच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या दिनांक १७/१०/२०२२ व १५/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये त्रुटी आहेत, अशा विद्यार्थ्यांची पुनःश्च प्रवेश पडताळणी/तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांशी संबंधीत संचालकांना निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार संबंधित संचालकांनी पुनश्च पडताळणी करुन अहवाल प्राधिकरणास सादर केलेले आहेत.

सविस्तर चर्चेनंतर, उक्त बाबी विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या पदवी / पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने संचालकांनी अभ्यासक्रम-निहाय सादर केलेल्या अहवालांचे अवलोकन करण्यात आले,-

याबाबत सांगोपांग चर्चा करुन उक्त नमूद सादर केलेल्या अहवालास अनुसरुन ज्या प्रवेश प्रकरणी संचालनालयांच्या अहवालानुसार / प्रवेश नियमानुसार पात्र आहेत, अशा प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. **(प्रपत्र-क)**. तथापि ज्या प्रकरणी संचालनालयाने प्रवेश मान्यते बाबत शिफारस केली नाही, अशा प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता नाकारण्यात येत आहे. **(प्रपत्र-ड)**. असा निर्णय घेण्यात आला.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(ग) <u>शैक्षणिक वर्ष २०१६-१७ व २०२१-२२ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तांवावर निर्णय घेण्याबाबत.</u>

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ व २०२१-२२ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव सादर केलेला आहे, अशा महाविद्यालयांचा अहवाल सचिव, प्रवेश नियमाक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी प्राधिकरणास सादर केला.

या संदर्भात सविस्तर चर्चा करुन तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता व संचालनालयाने सादर केलेल्या अहवालानुसार ज्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत, अशा प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे **<u>(प्रपत्र-इ)</u>**. तथापि महाविद्यालयाकडून झालेली दिरंगाई व बेजबाबदारपणा बाबत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर केलेल्या महाविद्यालयांना प्रत्येकी रु. ५ लाख व शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील महाविद्यालयांना प्रत्येकी रु. १ लाख दंड आकारण्यात येत आहे. सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र व दंडाची रक्कम सादर केल्यानंतर संबंधित महाविद्यालयांना प्रवेश मान्यता पत्रे निर्गमित करण्यात येतील. याबाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ज्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यतेचे प्रस्ताव अद्याप पर्यंत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर केलेले नाहित अशा महाविद्यालयांची यादी **<u>प्रपत्र - इ</u>** मध्ये देण्यात आली आहे. सदर महाविद्यालयांनी अधिनियम २०१५ च्या तरतुदींचे उल्लंघन केले असल्याने याबाबत अशा महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटिस बजावण्यात यावी. तसेच शासनाने याबाबत नोंद घेऊन संचालनालयाचा अहवाल प्राप्त करुन संबंधित महाविद्यालयांवर योग्य ती कार्यवाही करावी.

(घ) <u>प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील कंत्राटी तत्वावरील कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीबाबत.</u>

प्रस्तूत प्रकरणी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी सादर केलेल्या दिनांक ३१/०७/२०२३ रोजीच्या प्रस्तावाचे अवलोकन करुन सांगोपांग चर्चा करण्यात आली.

प्राधिकरण व सीईटी कक्षातील कामकाज व अपुरा कर्मचारीवृंद हया बाबी विचारात घेता सखोल चर्चा करुन खालील तालिकेमध्ये दर्शविल्यानुसार कर्मचाऱ्यांच्या वेतन वाढीस प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ) मागील वेतनामध्ये अतिरिक्त वाढ करुन देण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचा तपशील खालील प्रमाणे,-

| अ. क्र. | कंत्राटी कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम | प्राधिकरणाच्या निर्देशानुसार सद्यस्थितीमध्ये अदा करण्यात येणारे माहे जुलै - २०२३ चे वेतन | दिनांक १/०८/२०२३ पासून वाढ करुन देण्यात येणारे वेतन |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | श्री. मोहन तांबे, वरिष्ठ स्वीय सहायक | रु. ७५,०००/- | रु. ८०,०००/- |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

ब) कार्यालयाच्या दिनांक ३१/०७/२०२३ रोजीच्या टिपणीस खालील कर्मचाऱ्यांच्या वेतनास माहे मार्च २०२२ पासून सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांना असलेल्या वित्तिय अधिकारान्वये प्राधिकरणाच्या मान्यतेच्या अधीन राहुन खालील कर्मचाऱ्यांना वेतन वाढ देण्यात आली होती. त्यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यानुसार प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२३ रोजीच्या बैठकितील निर्णयामध्ये खालील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सुधारणा करुन माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये अदा करण्यात येत असलेले वेतन पुढील १ वर्षासाठी कोणतीही वाढ न करता अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या निर्णयामुळे त्यांना रकाना क्रमांक (४) मध्ये नमूद केलेले वेतन दिनांक ०२/०३/२०२३ पासून अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कंत्राटी कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम | प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्देशानुसार अदा करण्यात आलेले वेतन | माहे फेब्रुवारी २०२३ चे देण्यात येणारे वेतन | दिनांक १/०३/२०२३ पासून मान्यता दिलेले सुधारित वेतन |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | ॲड भारती गेरेला, विधी सहाय्यक | -- | रु. २५,०००/- | रु. ४०,०००/- |
| २. | कु. तेजस्विनी पवार, लिपिक टंकलेखक | रु. १६,५३८/- | रु. २६,२५०/- | रु. २६,२५०/- |
| ३. | श्री. योगेश कर्डक, लिपिक टंकलेखक | रु. १६,५३८/- | रु. २६,२५०/- | रु. २६,२५०/- |
| ४. | श्री. दिपक भातुसे, वाहनचालक | रु. १९,८४५/- | रु. २६,२५०/- | रु. २६,२५०/- |
| ५. | श्री. विलास तांबे, शिपाई | रु. १६,५३८/- | रु. १९,९५०/- | रु. १९,९५०/- |

प्राधिकरणाच्या निर्णयानुसार संबंधितांनी आवश्यक कार्यवाही त्वरीत करावी.

(ङ) **एम.ई.टी. इन्स्टिटयूट ऑफ इंजिनियरींग, भुजबळ नॉलेज सिटी, नाशिक येथील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. वैष्णवी अशोक क्षिरसागर यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.**

एमईटी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग, भुजबळ नॉलेज सिटी नाशिक या अभियांत्रिकी महाविद्यालयातील कु. वैष्णवी अशोक क्षिरसागर या विद्यार्थीनीला जात वैद्यता प्रमाणपत्र न मिळाल्याच्या प्रकरणामध्ये संस्थेने कोणताही निष्काळजीपणा केलेला नसल्याने संस्थेला करण्यात आलेला दंड रद्द करणेबाबत संस्थेने विनंती केली आहे.

या संदर्भात सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलकोन करुन सांगोपांग चर्चा करण्यात आली व चर्चे अंती एक वेळची विशेष बाब म्हणुन एमईटी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग, भुजबळ नॉलेज सिटी नाशिक येथील शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. वैष्णवी अशोक क्षिरसागर यांच्या प्रवेश प्रकरणी आकारण्यात आलेला दंड क्षमापित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(ज. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

उक्त नमूद निर्णय हा फक्त या महाविद्यालय व या प्रकरणी लागु राहिल, विषयांकित प्रकरणी दिलेल्या मान्यतेच्या निर्णयाचा भविष्यात पुर्वोदाहरण म्हणुन वापर केला जाणार नाही, असेही नमूद करण्यात आले.

(च) <u>मा. उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक १४९२/२०२२ मधील दिनांक ४/०५/२०२३ रोजीच्या न्यायालयीन आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील दत्ता मेघे कॉलेज ऑफ नर्सिंग, नागपुर येथील प्रथम वर्ष पदवी व्यावसायिक नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित कु. आकांक्षा कनोजिया या विद्यार्थीनीच्या प्रवेश मान्यते बाबत.</u>

दत्ता मेघे कॉलेज ऑफ नर्सिंग, नागपुर येथील शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित कु. आकांक्षा कनोजिया या विद्यार्थीनीच्या प्रवेश प्रकरणी जात वैधता प्रमाणपत्र प्रवेश बंद दिनांकानंतरचे असल्याने सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही. या संदर्भात मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या समोर ८/०१/२०२१ रोजी सुनावणी झालेली असून दिनांक ३०/१२/२०२१ रोजीच्या निर्णयान्वये सदरील पुनर्विलोकन याचिका अर्ज फेटाळण्यात आला आहे. प्रस्तूत प्रकरणी कु. आकांक्षा कनोजिया यांनी मा. उच्च न्यायालय, नागपुर खंडपीठ, नागपुर येथे याचिका क्रमांक १४९२/२०२२ दाखल केली असून दिनांक ४/०५/२०२३ रोजीच्या न्यायालयीन आदेशाचे अवलोकन करण्यात आले.

या संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात येवून तथापि मा. न्यायालयाच्या याचिका क्रमांक १४९२/२०२२ मधील दिनांक ४/०५/२०२३ रोजीच्या आदेशास अनुसरुन दत्ता मेघे कॉलेज ऑफ नर्सिंग, नागपुर येथील शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी नर्सिंग अभ्यासक्रमास प्रवेशित कु. आकांक्षा कनोजिया यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(छ) <u>सिध्दार्थ विधी महाविद्यालय, मुंबई महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता विधी - ३ वर्षे अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते बाबत.</u>

सिध्दार्थ विधी महाविद्यालय, मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील व्यावसायिक विधी - ३ वर्षे अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक १८/०४/२०२२ रोजीच्या निर्णयान्वये महाविद्यालयाने दंडाची पूर्तता पूर्ण केलेली आहे. या अनुषंगाने संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे यांनी सादर केलेल्या २९/०८/२०२२ रोजीच्या अहवालास अनुसरुन सदरील महाविद्यालयातील प्रवेशित २६० प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. या संदर्भात प्रवेश मान्यता पत्र निर्गमित करण्याबाबत कार्यालयाने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

(ज) <u>मा. उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक ५६४/२०२२ मधील दिनांक २४/०४/२०२३ रोजीच्या न्यायालयीन आदेशान्वये अमोलकचंद विधी महाविद्यालय, यवतमाळ येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विधी - ३ वर्ष अभ्यासक्रमास प्रवेशित कु. भारत रमेश वाघमारे यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.</u>

अमोलकचंद विधी महाविद्यालय, यवतमाळ येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विधी - ३ वर्षे अभ्यासक्रमास प्रवेशित श्री. भारत रमेश वाघमारे यांच्या प्रवेश मान्यतेबाबत मा. उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक ५६४/२०२२ मधील दिनांक २४/०४/२०२३ रोजीच्या न्यायालयीन आदेशास अनुसरुन सदरील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(झ) **<u>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी कला अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांची प्राधिकरण स्तरावर १% निवडक पध्दतीने तपासणी/छाननी करण्यात आलेला उपसमितीचा दिनांक १४/०४/२०२३ रोजीचा अहवाल.</u>**

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक कला अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी ०१ टक्के प्रवेश मान्यता प्रस्तावांची निवडक पध्दतीने प्रत्यक्ष छाननी व पडताळणी करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशानुसार उपसमिती गठित करण्यात आलेली आहे. त्यानुसार व्यावसायिक कला अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी कार्यवाही झालेली असून सदरील उपसमितीने सादर केलेल्या दिनांक १४/०४/२०२३ रोजीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली व तद्नुषंगाने सांगोपांग चर्चा करण्यात आली. सदरील अहवालानुसार कला शिक्षण अभ्यासक्रमांची प्रवेश मान्यता पत्रे मान्यतेकरिता सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

तसेच या संदर्भात श्री. महेंन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई, श्री. तुषार यशवंत शिंदे, कक्ष अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण व श्री. वि.गो. सकपाळ, परीक्षा समन्वयक, कला शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे.

(ञ) **<u>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी कला शिक्षण अभ्यासक्रमास शारीरिक विकलांग संवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी उपसमितीचा दिनांक २८/०६/२०२३ रोजीचा अहवाल</u>**

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०२/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. १(९) मधील निर्देशास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पदवी कला शिक्षण अभ्यासक्रमास शारीरिक विकलांग संवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांची प्राधिकरण स्तरावर तपासणी / छाननी करण्यात आली, या संदर्भात उपसमितीने सादर केलेल्या २८/०६/२०२३ रोजी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली व तद्नुषंगाने सांगोपांग चर्चा करण्यात आली. उपसमितीच्या अहवालानुसार ज्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाही अशा प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सदरील अहवालानुसार सर जे.जे. इन्स्टिटयूट ऑफ अप्लाईड आर्ट, मुंबई व डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ अप्लाईड आर्ट व क्राप्ट, पुणे येथील विकलांग सवंर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संबंधित महाविद्यालयास तपासणी/छाननी प्रक्रियेस उपस्थित राहण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक २२/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये (ईमेलद्वारे) कळविण्यात आले होते, परंतू सदरील महाविद्यालये हेतुपुरस्पर अनुपस्थित राहिले असल्याचे दिसून येत आहे. सबब महाविद्यालयाच्या निष्काळजीपणा व गैरजबाबदारपणामुळे सदरील प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता नाकारण्यात येत असून, या संदर्भात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास त्यास सर्वस्वी संबंधित महाविद्यालयांना जबाबदार ठरविण्यात येत आहे.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(ट) **<u>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर आरोग्य विज्ञान व आयुष अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांची प्राधिकरण स्तरावर १% निवडक पध्दतीने तपासणी/छाननी करण्यात आलेला उपसमितीचा अहवाल.</u>**

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक आरोग्य विज्ञान व आयुष अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी ०१ टक्के प्रवेश मान्यता प्रस्तावांची निवडक पध्दतीने प्रत्यक्ष छाननी व पडताळणी करण्यांबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०१/२०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशानुसार उपसमिती गठित करण्यात आलेली आहे. त्यानुसार कार्यवाही झालेली असून सदरील उपसमितीने सादर केलेल्या दिनांक २६/०७/२०२३ व २७/०७/२०२३ रोजीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली व तद्नुषंगाने सांगोपांग चर्चा करण्यात आली. सदरील अहवालानुसार आरोगय विज्ञान व आयुष शिक्षण अभ्यासक्रमांची प्रवेश मान्यता पत्रे मान्यतेकरिता सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

तसेच या संदर्भात श्री. महेंन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई, श्री. तुषार यशवंत शिंदे, कक्ष अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण व श्री. सिध्देश नर, परीक्षा समन्वयक, वैद्यकीय / आयुष शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे.

(ठ) **<u>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांची प्राधिकरण स्तरावर १% निवडक पध्दतीने तपासणी/छाननी करण्यात आलेला उपसमितीचा अहवाल.</u>**

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी तपासणी/छाननी प्रक्रियेकरिता बोलाविण्यात आलेल्या एकुण ०४ महाविद्यालयांपैकी ०१ महाविद्यालय अनुपस्थित होते, सदरील महाविद्यालयास प्राधिकरणाच्या निर्देशानुसार पुनश्च बोलाविण्यता आले व त्यानुसार तपासणी/छाननी करण्यात आलेली आहे. या संदर्भात उपसमितीने सादर केलेल्या दिनांक २१/०७/२०२३ रोजीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली व तद्नुषंगाने सांगोपांग चर्चा करण्यात आली. सदरील अहवालानुसार संबंधित महाविद्यालयाचे प्रवेश मान्यता पत्रे मान्यतेकरिता सादर करण्याबाबत निर्देश देण्यात येत आहे.

तसेच उर्वरित १% निवडक पध्दतीने प्रवेश तपासणी / छाननी करिता गैरहजर राहिलेल्या ०३ महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांचे प्रवेश पुन:श्च तपासणी करुन त्याचा अहवाल आगामी बैठकित सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

(ड) **<u>अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार अनिवासी भारतीय कोटयांतर्गत प्रवेश विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबंत.</u>**

याबाबत सांगोपांग चर्चा करण्यात आली व चर्चेअंती अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार १५% टक्के अनिवासी भारतीय कोटयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सोबत जोडलेल्या **<u>प्रपत्र-फ</u>** नुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(ढ) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी विषयाची तालडी लक्षात घेता, बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. या संदर्भात अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे दोन्ही विभागातील संबंधीत विभागांना बैठकीचे इतिवृत्त उपलब्ध करुन देतील, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता १) संचालनालय, तंत्र शिक्षण, मुंबई, २) संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे व ३) आयुष संचालनालय, मुंबई आणि प्राधिकरण कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी परिपूर्ण माहिती/अहवाल विहित कालावधीमध्ये सादर केलेले आहेत, या त्यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : १८/८/२३